दि. ०४/०४/२०२५

# प्रेसनोट

ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून वनपरिक्षेत्र कार्यालय, सासवड वनविभाग, जि. पुणे येथील वनरक्षक यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ३० वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. गोविंद रामेश्वर निर्डे, वय ३२ वर्ष, पद वनरक्षक, नेमणुक - वनपरिक्षेत्र कार्यालय, सासवड वनविभाग, जि. पुणे (वर्ग-३, अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २,००,०००/- (दोन लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,००,०००/- (एक लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०४/०४/२०२५ |
| सापळा दिनांक | ०४/०४/२०२५ रोजी |
| ठिकाण | श्रीनाथ रसवंती गृह, वीर फाटा, सासवड, जि. पुणे |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती. भारती मोरे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८७०१५६५८६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यानी त्यांच्या पाळीव जनावरासाठी मुरघास तयार करण्यासाठी खोदलेला खड्डा वनविभागाच्या जागेत खोदला होता. वनविभागाने सांगितल्यानंतर तक्रारदार यांनी तो खड्डा बुजवला. परंतू लोकसेवक गोविंद निर्डे यांनी तक्रारदारावर वन अधिनियमानुसार गुन्हा नोंदवून कारवाई न करण्यासाठी तक्रारदाराकडे २,००,००० रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार दि. ३/०४/२०२५ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ४/०४/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक गोविंद निर्डे यांनी तक्रारदाराकडे त्यांचे विरुद्ध वन जमिनीवर केलेल्या अतिक्रमणावर वन अधिनियमानुसार गुन्हा दाखल न करण्याकरीता सुरवातीस २ लाख रुपयाचे लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती १,००,००० रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज दि. ४/०४/२०२५ रोजी लोकसेवक गोविंद निर्डे यांनी तक्रारदाराकडून १,००,००० रुपये लाच रक्कम श्रीनाथ रसवंती गृह, वीर फाटा, सासवड, जि. पुणे येथे पंचासमक्ष स्विकारली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक विजय चौधरी, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner